Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा सुधारित अहवाल

# (एप्रिल ते जून २०२४)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


फेब्रुवारी -२०२४

## बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष — फेब्रुवारी - २०२४


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ६ टक्के मक्याचे उत्पादन कमी होण्याच्या अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मका निर्यात २०२१-२२ मध्ये ३४ लाख टन झाली होती त्यामध्ये चालू वर्षी २०२२-२३ मध्ये ६ लाख टनांची वाढ होऊन ती ४० लाख टन होईल असा अंदाज आहे.




केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या पहिल्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२३-२४मध्ये मक्याच्या उत्पादनात घट होईल असा अंदाज आहे.





देशात चालू वर्षी ऑक्टोबर २०२३ मध्ये मक्याची आवक मागील वर्षीच्या तुलेनत ६० टक्के इतकी जास्त झाली आहे.




महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या पहिल्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात खरीफ २०२३-२४ मध्ये मक्याच्या उत्पादनात घट होईल असा अंदाज आहे.

खरीप हंगाम २०२३-२४ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २०९० प्रति क्विं. इतकी आहे.





मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या एप्रिल ते जुन महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे

२०२१ - रुपये १७५१ प्रति क्विंटल
२०२२ - रुपये २१५२ प्रति क्विंटल
२०२३ - रुपये १८५३ प्रति क्विंटल


**एप्रिल ते जुन २०२४ महिन्यासाठी मक्याचे नांदगाव बाजारातील किंमत अंदाज पुढील प्रमाणे रुपये २००० ते २४०० प्रति क्विंटल**

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **फेब्रुवारी २०२४**


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे -मुक्त आयात धोरण मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे.





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२३-२४ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३४.२१ लाख टन होण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ३ टक्क्यांनी जास्त आहे. तसेच महाराष्ट्रातील २०२२-२३ मधील उत्पादन ९.२ लाख टनांवरून सन २०२३-२४ मध्ये ८.७ लाख टनांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये आयात वाढलेली आहे तर निर्यात कमी झालेली आहे




माहे डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष नोव्हेंबर २०२२-२३ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी राहिलेली दिसून येत आहे. फेब्रुवारी २०२४ (१५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत) मध्ये १२.७ लाख टन आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत२१.२ लाख टन होती.




डिसेंबर २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत.मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या एप्रिल ते जून मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| एप्रिल ते जून२०२१: | रु. ६,५२५/क्विंटल |
| एप्रिल ते जून२०२२: | रु. ६,१६८/क्विंटल |
| एप्रिल ते जून२०२३: | रु. ९,१८०/क्विंटल |

सध्याच्या हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ७०००/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती जास्त आहेत.

## लातूर बाजारातील संभाव्य किंमती


**एप्रिल ते जून २०२४: ८५०० ते १०५००/क्विं**

**(गेल्या वर्षांच्या तुलनेत चालू वर्षातील आयात जास्त राहील असे गृहीत धरून हा अंदाज वर्तविण्यात आला आहे)**

सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या तरीसाठी आहे


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — फेब्रुवारी २०२४

**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे १३६.३ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते.


महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये निर्यात वाढलेली आहे तर आयात कमी झालेली आहे




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष फेब्रुवारी २०२३-२४ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. फेब्रुवारी २०२४ (१५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत) मध्ये ती ०.५ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत २.५ लाख टन इतकी होती.




ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत. ऑगस्ट २०२३ नंतर, त्या सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या एप्रिल ते जून मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| एप्रिल ते जून २०२१: | रु. ४,८४४/क्विंटल |
| एप्रिल ते जून २०२२: | रु. ४,५२५/क्विंटल |
| एप्रिल ते जून २०२३: | रु. ४,८१०/क्विंटल |

सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५३३५/क्विंटल आहे.


## लातूर बाजारातील संभाव्य किंमती

### एप्रिल ते जून २०२४: रु. ५,२०० ते ५,८००/क्विं


सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या हरभऱ्यासाठी आहे

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — फेब्रुवारी २०२४


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत





भारतात सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनचे उत्पादन ११० लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ११ टक्केनी कमी आहे. ( स्त्रोत: WASDE, USDA, जानेवारी २०२४)





अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जानेवारी २०२३) अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, जगात ३९८८ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी (३७४३ लाख टन, २०२२-२३) अधिक आहे.





सन २०२२-२३मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. चालू वर्षी एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत १२.११ लाख टन सोयापेंड निर्यात झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत सोयापेंड निर्यात जास्त झाली आहे झाली.(स्त्रोत:SEAअहवाल)




चालू वर्षी नोव्हेंबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीत ३.०२ लाख टन सोयातेलाची आयात झाली आहे, मागील वर्षीच्या तुलनेत कमी आहे. (स्त्रोत: SEA अहवाल, १२ फेब्रुवारी २०२४).




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात सोयाबीनची मासिक बाजारात आवक ऑक्टोबर महिन्यात जास्त होती त्यांनतर नोव्हेंबर महिन्यापासून कमी झाली आहे. ( स्त्रोत: Agmarknet)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत. ( स्त्रोत: Agmarknet). मागील तीन वर्षातील एप्रिल ते जून या कालावधीतील महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

एप्रिल ते जून २०२१: रु. ७०७९ प्रती क्विंटल.
एप्रिल ते जून २०२२: रु. ६९३० प्रती क्विंटल.
एप्रिल ते जून २०२३: रु. ५०५६ प्रती क्विंटल.

सन २०२३-२४ हंगामासाठी किमान आधारभूत किंमत रु. ४६०० प्रती क्विंटल आहे.


### लातूर बाजारातील संभाव्य किंमती –
### एप्रिल ते जुन २०२४ : रु. ४५०० ते ५१०० प्रती क्विंटल

सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.


**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **फेब्रुवारी २०२४**

## कापूस


कापूस हे भारतातील सर्वात महत्वाचे व्यावसायिक पीक आहे जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी 25% वाट भारताचा आहे आहे.





गेल्या वर्षी 14 वर्षांमधील नीचांकी उत्पादनावर गेल्यानंतर, भारतातील कापूस पीक 337 लाख गाठी म्हणजे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या तुलनेत 26 लाख गाठींनी जास्त असल्याचा अंदाज आहे.





2023-24 मध्ये जागतिक कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत किरकोळ वाढण्याची अपेक्षा आहे ( 0.5 टक्के किंवा 600,000 गाठी) ते 115.0 दशलक्ष गाठी युनायटेड स्टेट्समध्ये जास्त उत्पादनाची अपेक्षा तसेच चीन, तुर्कस्तान आणि पाकिस्तान मध्ये कमी उत्पादनाचा अंदाज आहे. (स्रोत:USDA –Cotton Outlook)




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत , मागील वर्षाच्या तुलनेत 2022-23 मध्ये आयातीत 55% वाढ आणि निर्यातीत 23% घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीव दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयातीत 3.84% वाढ आणि निर्यातीत 1.81% घट झाली आहे.




मार्च महिन्यात बाजारात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे.




अकोला बाजारपेठेत कापसाचे भाव किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त आहेत. मागील तीन वर्षातील एप्रिल ते जुन या कालावधीतील कापसाच्या किमती पुढील प्रमाणे

एप्रिल ते जुन २०२१ - रु ६,८२४ प्रति क्विंटल

एप्रिल ते जुन २०२२ – रु ११,६१८ प्रति क्विंटल

एप्रिल ते जुन २०२३ – रु ७,९८३ प्रति क्विंटल

**एप्रिल ते जुन २०२४ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७,००० ते ८,००० प्रति क्विंटल**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा*

अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,

सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६

फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com

वेबसाईट: https://www.smart-mh.org